International Journal for Innovative Engineering and Management Research
PEER REVIEWED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL
www.ijiemr.org

# महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या : अहवालांचा चिकित्सक अभ्यास

डॉ. बाळासाहेब बी. पवार
राज्यशास्त्र विभाग
न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर

**जागतिकीकरणा नंतर भारतात शेतकरी आत्महत्याची संख्या वधू लागली. शेतकरी संघटना व सामाजिक कार्यकर्ते या संदर्भात आवाज उठवू लागले , पी. साईनाथ ,वंदना शिवा यांनी या बाबत लिखाण करून हे वास्तव जगापुढे आणले,त्यानंतर महाराष्ट्रातील काही संशोधन संस्थांनी याबाबत अभ्यास अहवाल तयार केले त्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.**

**श्री. र.पु. कुरुलकर यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या ७७प्रकरणांचा अभ्यास करून निष्कर्ष व शिफारशी केल्या आहेत." (२००६ )**

मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात कुरुलकर यांनी शेती क्षेत्रातील विदारक स्थितीचे सविस्तर स्पष्टीकरण केले असून मराठवाडयाची अपर्याप्त सिंचन क्षमता, अपुरा पतपुरवठा, शेतजमिनीचे तुकडीकरण, अल्प कृषी उत्पादकता, वाढता उत्पादन खर्च, पूर परिस्थिती, कोरडा दुष्काळ, बोज भारनियमन, निकृष्ट बो-बियाणे व खते. शेती मालांच्या विक्रीतील अडचणी व कमी बाजारभाव यामुळे शेतकरी अडचणीत सापडल्यामुळे तो कर्जबाजारी होत आहे. विशेष करून सीमांत व लहान शेतकरी यांना अशा परिस्थितीत आत्महत्येशिवाय पर्यायच राहत नाही असे नमूद केले आहे. दि.१/१/०६ ते ५/७/०६ या काळात मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत १३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यापैकी ७७ प्रकरणांचा अभ्यास 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेने केला आहे. यात औरंगाबाद-८, परभणी -३० हिंगोली- ९. बीड - ३५. जालना -५. लातूर-५. उस्मानाबाद ३ विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर केंद्र व राज्याने मोठे पॅकेज दिले. परंतु विदर्भाप्रमाणे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात आत्महत्या होऊनसुद्धा कोणतेही पॅकेज किंवा मदत मिळाली नाही.

**निष्कर्ष :**

१. शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याची गरज आहे.

२. गृहकलह सावकारी कर्ज इ. आत्महत्या केलेल्यांना तात्काळ १ लक्ष रुपये मदत मिळावी.

३. सर्व सीमांत, लहान व ४ हेक्टरहून कमी क्षेत्र असलेल्यांचे संपूर्ण कर्ज व व्याज माफ करावे.

४. पतपुरवठ्याची पुनर्स्थापना करून ६% दराने शेतकऱ्यांना कर्ज द्यावे.

५. सावकारांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या गहाण पडलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून द्यावात.

६. बीड जिल्हा आणि मराठवाड्यात आत्महत्या वाढत असल्याने मराठवाड्यासाठी विदर्भाप्रमाणे स्वतंत्र पॅकेज मिळावे.

**उपाययोजना :**

१) ४ हजार कोटीचे रेंगाळलेले सिंचन प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करून सिंचन क्षेत्र वाढवावे.

२) १००% सबसिडी देऊन ठिबक सिंचन योजना अमलात आणावी.

नाबार्डसारख्या संस्थेच्या मदतीने पाणलोटाबरोबरच व्यापक प्रमाणात विहिरी ३) खोदाव्यात व विहीर पुनर्भरण योजना राबवावी.

४) प्रदेश व जिल्ह्यात विशिष्ट फलोत्पादनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीचे प्रयत्न व्हावेत.

५) कापसाच्या दर्जेदार बियाणांसाठी विशेष तरतूद व्हावी.

६) पशुसंवर्धन, दुभती जनावरे व धरणात मत्स्योद्योग यात मराठवाड्यात भरपूर वाव आहे हे उपाय लवकर अमलात आणावेत.

७) किमान आधारभूत किमतीचे धोरण नव्याने अवलंबून शेतकऱ्यांना न्याय

द्यावा.

८) पीक विम्यामधील टप्प्यामध्ये सवलत देत सर्वकष पीक विमा पद्धत अवलंबून त्यांचा थेट लाभ शेतकऱ्यांना मिळावा.

९) राज्यातील आर्थिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न व्हावेत.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे: एक चौकशी (१५ मार्च २००५), टाटा सामाजिक विज्ञान संस्था.**

टिस'च्या समितीत प्रा. अजय दांडेकर, शहाजी नरवडे, श्री. रा. ग. राठोड, श्री.राजेश इंगळे, श्री. विजय कलकर्णी, श्री सत्यप्पा आय.डी. यांनी डिसेंबर २००८ पर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदवलेल्या ६४४ पैकी ३६ शेतकरी आत्महत्या प्रकरणांची निवड करून १२ जिल्ह्यांतील प्रकरणांचा अभ्यास करून आपला अहवाल १५ मार्च २००५ रोजी उच्च न्यायालयाला सादर केला."

**आत्महत्येची कारणे :**

'टिसने' भारताचे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत आहे काय? या बाबत महत्त्वपूर्ण संशोधन आपल्या अहवालात केले.

जागतिकीकरणाच्या काळापासून कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी कमी होत गेली आहे. त्यामुळे शेती व ग्रामविकासाचा खोळंबा झाल्यामुळेच 'टिसने' भारतातील कृषी व्यवस्था धोक्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. 'टिस'ने वाढता उत्पादन खर्च, वारंवार शेत जमिनींची होणारी नापिकी यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त वाढल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येकडे वळतो असे आपल्या अहवालात नमूद कले आहे. उत्पादन खर्च वाढीची कारणमीमांसा करताना पाहणीद्वारे १९९५ नंतर आदानाच्या

किमतीत झालेली वाढ, पीक संरक्षणासाठी आवश्यक औषधांच्या वाढलेल्या किमती, तसेच या औषध वापराने पिकाचे संरक्षण होऊ शकले नाही. अधिक उत्पादन देणाऱ्या बियाणांच्या किमतीदेखील वाढलेल्या आहेत. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढला आहे. 'टिस'च्या अहवालानुसार ७५% शेतकऱ्यांनी घेतलेली कर्ज ही असंस्थागत स्त्रोतांकडून घेतलेली होती. सतत ४ ते ५ वर्षे नापिकी व दुष्काळसदृश परिस्थिती असल्यामुळे शेतकरी पूर्वीच्या कर्जाची परतफेड करून शकले नाहीत. त्यामुळे शेती करण्यासाठी बँका, सावकार, नातेवाईक यांचे कर्ज घेतले व सर्व मार्ग खुंटले. परतफेड झाली नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

**कारणे -**

१. कर्जबाजारीपणा.

२. उत्पन्न खर्च व हमीभाव त्याचप्रमाणे मुक्त बाजारातील दर यामध्ये मेळ न राहिल्याने कर्जाचा बोजा शेतकऱ्यांवर वाढत गेला.

३. सलग चार वर्षे पीक न आल्याने उत्पन्न घटले. खते, कीटकनाशके यांचा मोठ्या प्रमाणावर वापर, जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांवर अवलंबित्य, काही प्रमाणात बी.टी. बियार्णामुळे शेतकरी अपयशी ठरला.

४. मध्यम व लहान शेतकरी कर्जबाजारी झालेले दिसतात. अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे.

५. सावकार हा कर्ज पुरवठा करणारा मुख्य स्त्रोत आहे. बैंकिंग क्षेत्र कर्ज पुरवठा योग्य प्रमाणात करत नसल्यामुळे शेतकरी सावकारांकडे जातात.

६. महाराष्ट्रातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. सिंचनाची पुरेशी सोय नसल्यामुळे नगदी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जाचा फटका बसला कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्यांनी नगदी पिकांच्या दुष्टचक्रात शेतकरी अडकले व कर्जबाजारी झाले.

७. सरकारी यंत्रणेकडून अपेक्षित असलेली शेतीविषयक माहिती मिळाली नाही. तर ती खते व बि-बियाणे दुकानदार व कंपन्यांकडून मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे नृकसान झाले.

८. शेतकऱ्यांकडे बघण्याचा सरकारचा दृष्टिकोन उदासीन आहे.

९. शेतकऱ्यांचे विशेषतः छोट्या व मध्यम क्षेत्रधारक शेतकऱ्यांचे रक्षण करणारी कुठलीही सरकारी यंत्रणा अस्तित्वात नाही.

**तात्कालिक शिफारशी -**

International Journal for Innovative Engineering and Management Research
PEER REVIEWED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL
www.ijiemr.org

१ आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना प्राधान्यक्रमांनुसार २.५ लक्ष रूपये मदत करायी की ज्यामुळे त्यांचे कुटुंबीय सम्मानपूर्वक जीवन जगू शकतील.

२. समितीच्या प्रमुख व्यक्ती व प्रतिनिधी संस्था वा स्वयंसेवी संस्थांकडून आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांची अचूक व पूर्ण यादी मिळवून ती विशिष्ट वेळेच्या मर्यादेत न्यायालयात सादर करायला पाहिजे. त्यासाठी न्यायालयाने त्या संबंधीचे आपले चौकशी कार्य आत्महत्या झालेल्या जिल्ह्यांतील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करावे.

३. संपूर्ण शेतकरी आणि त्यांची उत्पादन पद्धती विमाअंतर्गत कशी आणता येईल की ज्यामुळे किमान जीवन आधाराची सुरक्षितता मिळेल. या दृष्टीने न्यायालयाने राज्य व केंद्र सरकार तसेच एल.आय.सी. किंवा भारतीय कृषी विमा कंपनीकडे तात्काळ विचारणा करावी.

४. न्यायालयाने सरकारला प्रत्यक्ष कृती करायला सांगायला पाहिजे. इ-नेटवर्कसारख्या व्यवस्थेद्वारे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध व्हायला मदत होईल. त्याचप्रमाणे उत्पादन व्यवस्थित करण्याकरिता सेंद्रिय व नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे.

**दीर्घकालीन शिफारशी :**

१. शेतीचे उत्पादन व्यय कमी करण्यासाठी शासनाने बियाणे व पीक संरक्षके पुरवणाऱ्या कंपन्यांचा नफा कमी करून लाखो शेतकऱ्यांचा शेतीचा उत्पादन व्यय कमी करण्यावर भर द्यावा. शेतकऱ्यांना स्वस्तात कर्ज मिळविण्यासाठी केंद्र सरकारने नाबार्डद्वारे शेतीसाठी कर्ज पुरवठ्याचे व्याजदर कमी ठेवावेत.

२. शेती पिकांना आधारभूत किमती ठरवून द्याव्यात.

३. शेतकऱ्यांशी व शेतीशी संबंधित आयोग नेमावा. त्यांनी जैव सुधारित बियाणांच्या भारतीय शेतीवरील परिणाम, कृषी माल किमत धोरण, पीक पद्धती, पीक विमा या बाबत योग्य निर्णय घ्यावा.

**श्रीजित मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी विकास संस्थेने सर्वेक्षण करून Suicide of Farmers In Maharashtra 26-1-2006 (Indira Gandhi Institute of Development)**

अहवाल २६ जानेवारी २००४ सादर केला. यात महाराष्ट्रातील कापूस उत्पादक क्षेत्रात ज्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून येत आहेत. त्यामागील सामाजिक व आर्थिक घटक समजून घेणे व संबंधित जबाबदार घटकांची कारणमीमांसा करून त्या नियंत्रित करण्याचे धोरण सुचवणाऱ्या

International Journal for Innovative Engineering and Management Research
PEER REVIEWED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL
www.ijiemr.org

श्रीजित मिश्रा यांनी यवतमाळ, अमरावती अकोला, वर्धा या जिल्ह्यांतील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा आर्थिक, सामाजिक सर्व्हे केला असून महराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण हे भारतातील (आत्महत्या) पेक्षा ५०% जास्त असल्याचे दाखवून दिले आहे. त्याचबरोबर विदर्भातील शेतकरी मागील एक दशकापासून संकटात आहे. त्यास सुलभ कृषी अर्थसाहाय्य व तंत्रज्ञान न मिळणे, वाढता कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता या समस्या आहेत. अमेरिकेतील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना भारतीय शेतकऱ्यांपेक्षा ५०% पेक्षा जास्त मिळणारी सबसिडी त्याचबरोबर भारत सरकारने कापसावरील आयात कर अत्यंत कमी लावल्यामुळे भारतातील कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. या सर्व कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करतात हे स्पष्ट होते.

बियाणांच्या किमती अतिशय जास्त असून खासगी कंपन्या भेसळ विक्री करत असल्याने उत्पादनाचा दर्जा खालावला आहे. तसेच कीटकनाशकांच्या किंमती सुद्धा भरमसाट वाढल्या आहेत.भांडवलाची गरज, सिंचन अनुशेष, किंमत धोरण आदी बाबींचा अभ्यास करून पुढील उपाय सुचवले आहेत.

**शिफारशी** :

१. दर्जेदार व जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाणांचे वाटप करावे.

२. शेतीतून दर्जेदार आणि जास्त उत्पादन मिळविता येण्याकरिता योग्य कीटकनाशके खते, जल व्यवस्थापन इ. संदर्भात शेतकऱ्यांसाठी सल्ला व मार्गदर्शन यंत्रणा निर्माण करावी.

३. खाजगी सावकारांचा बंदोबस्त करावा.

४. जलसंधारणाची योग्य व्यवस्था करावी. भू-जलपातळीत वाढ व्हावी. विहीर /विधन विहिरीचे पूनर्भरण करावे.

५. शेतकऱ्यांशी संबंधित विविध योजनांच्या योग्य अंमलबजावणीवर भर द्यावा

.६. विदर्भाचा सिंचन अनुशेष भरून काढावा.

७. विदर्भाच्या बाबतीत वेगळी विभागीय विकास योजना तयार करावी.

८. ग्राहक संरक्षण चळवळ व व्यवस्था निर्माण करावी.

**दीर्घकालीन उपाय :**

१. शेतकऱ्यांना योग्य मोबदला आणि किंमत मिळावी यासाठी उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव ठरवावा.

२. कापसाचे मूल्य वर्धित करण्यासाठी कॉटनमिल टेक्स्टाईल्स उद्योगात विशेषतः विदर्भात गुंतवणूक करणे.

३. शेतकऱ्यांची संघटन शक्ती वाढवून आपल्या रास्त मागण्यांसाठी दबाव वाढवावा.

४. सहायक निधी आणि स्वयंसाहाय्यता गटांची स्थापना करणे.

५. पिक विम्याच्या अंतर्गत सर्व पिकांना संरक्षण देणे.

**दैनिक सकाळ सर्वेक्षण शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक शोध**

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत यवतमाळ व अमरावती या जिल्ह्यांतील १२० गावांतील शेतकऱ्यांच्या स्थितीचे दै. सकाळने सर्वेक्षण करून "शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक शोध" हा अहवाल मुख्यमंत्र्याला २१ मार्च २००६ रोजी सादर केला." कर्जबाजारीपणा व नापिकी हे या आत्महत्यांमागचे कारण असल्याचे या अहवालात स्पष्ट केले आहे.

**कारणे -**

१. कर्जबाजारीपणा व शेतजमिनीची सततची नापिकी.

२. शेती खर्चासाठी होणारा अपुरा कर्जपुरवठा सावकाराकडून भरमसाट व्याज आकारणी करून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक.

३. सिंचन सुविधांचा अभाव असल्याने कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त.

४. शेतीपूरक व्यवसायांचा अभाव.

५. उत्पादन खर्चाच्या तुलनेने शेतीमालाला भाव मिळत नाही.

**उपाय -**

१. कर्ज वितरण प्रणालीत आमूलाग्र बदल करावेत.

२. कृषी पतपुरवठ्यात आवश्यकतेनुसार वाढ करावी.

३. खाजगी सावकारांवर नियंत्रण आणावे.

४. सिंचन प्रकल्प त्वरित मार्गी लावावेत व सिंचनाचा अनुशेष भरून काढावा.

वरील अहवलांची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने काही सरकारी समित्या नेमल्या ते अहवाल स्विकारले शेतकरी आत्महत्या बंद व्हाव्यात यासाठी आर्थिक मदतीच्या घोषणा केल्या परंतु शेतकरी आत्महत्या थांबल्या नाहीत. परंतु या सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संशोधन संस्था यांनी दिलेलें अहवाला मुळे या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले हे मान्य करावे लागेल .

**संदर्भ :**

१) दुभाषी पद्‌माकर (२००६) जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण, श्री विद्‌या प्रकशन शनिवार पेठ, पुणे.

२) बोकरे दिवाकर (२००८) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांवतील कशा?, डायमंड पचिनकेशन, पुणे.

३) बोकरे दिवाकर "आत्महत्यांना सरकारी धोरणेच जबाबदार शेतकरी आत्महत्या : चितन आणि उपाय सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, पृष्ठ १२८ ते १३५

४) खुपसे मार्तड (२००६) शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता अणि चिंतन, समीर प्रकाशन कळंब, यवतमाळ.

५) राठोड ग.ह. (२००६), शोषित शेतकरी आत्महत्यांची मूलभूत कारणे, राजगुरु प्रकाशन, कचनेर, जि. औरंगाबाद.

६) जाधव नरेंद्र (२००८) शेतकरी आत्महत्या संदर्भातील पॅकेजचे मूल्यमापन करण्यासाठी नेमलेल्या एकसदस्यीय समितीचा अहवाल.

७) र.पु. कुरुलकर Report on Farmers Suicide in Marathwada Region of Maharashtra by Swami Ramanand Teerth Research Institute Aurangabad. November. 2006.

८) टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस: महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे: एक चौकशी (१५ मार्च, २००५)

९) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरील अहवाल, आयजीआयडीआर मुंबई, २६ जानेवारी, २००६

१०) विदर्भावरील तथ्य शोध पथकाचा अहवाल, भारत सरकार नियोजन आयोग ३० मे २००६.

११) दैनिक सकाळ, औरंगाबाद 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक शोध' दि. १/६/२००६